क्रमांक : १००

# महाराष्ट्र विधानपरिषद
## पत्रक भाग दोन
## रविवार, दिनांक ०७ डिसेंबर, २०२५/ अग्रहायण १६, १९४७ (शके)

**(संदर्भ : पत्रक भाग दोन क्रमांक ३५/४२, शुक्रवार, दिनांक २१ मार्च, २०२५)**

**११३. :: म.वि.प.नियम २५९ अन्वये "अंतिम आठवडा प्रस्ताव" व म.वि.प.नियम २६० अन्वये सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबींवर चर्चा करण्याबाबतचे प्रस्ताव स्वीकारण्याबाबत ::**

१. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२५ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनात म.वि.प.नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा व म.वि.प.नियम २६० अन्वये सार्वजनिक हितासंबंधाच्या बाबींवर चर्चा करण्याबाबतचे प्रस्ताव **DMOIS** या आज्ञावली **(WEB PORTAL)** व्दारे ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. तसेच ज्या दिवशी प्रस्ताव चर्चेसाठी घेण्यात येणार आहे, त्याच्या आदल्या कामकाजाच्या दिवशी तो प्रस्ताव **संपूर्णत: ऑनलाईन पद्धतीने** सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येईल.

२. म.वि.प.नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा व म.वि.प.नियम २६० अन्वये देण्यात यावयाच्या प्रस्तावांमध्ये केवळ चार-पाच विभागांशी संबंधित विषय समाविष्ट असावेत.

३. म.वि.प.नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा व म.वि.प.नियम २६० अन्वये प्राप्त होणाऱ्या प्रस्तावाचे प्रारुप नेमके, वस्तुस्थितीदर्शक, सुस्पष्टपणे नमूद करुन संबंधित विभाग स्पष्टपणे नमूद करावा. तसेच सदर प्रस्तावाचे प्रारुप जास्तीत जास्त २०० शब्दांचे असावे. लांबलचक, व्यापक किंवा आरोपात्मक प्रारुप आढळल्यास त्यात योग्य त्या सुधारणा करुन अशा प्रारुपास मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या अधिकारात अंतिम करण्यात येईल, असे सूचित करण्यात येत आहे.

४. म.वि.प.नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा व म.वि.प.नियम २६० अन्वये प्राप्त होणाऱ्या प्रस्तावाच्या सूचना स्वीकृती संबंधी व स्वीकृत प्रस्ताव चर्चेला घेण्यासंबंधीचा संपूर्ण अधिकार मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचाच राहिल.

५. म.वि.प.नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा व म.वि.प.नियम २६० अन्वये प्राप्त होणाऱ्या प्रस्तावाच्या सूचना पुढील कार्यवाहीकरिता संबंधित **विभागांना ऑनलाईन पध्दतीने** उपलब्ध करुन देण्यात येतील.

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : ०७ डिसेंबर, २०२५.

**डॉ.विलास आठवले**
सचिव - ३
महाराष्ट्र विधानपरिषद

..२/-

**याची प्रत माहितीस्तव :-**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सदस्य

२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव

३) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी

४) सचिव - १, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

५) सचिव - २, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

६) सचिव - ३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

७) सचिव - ४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी

९) प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग, शिबीर कार्यालय, नागपूर

१०) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये

११) संगणक कक्ष (संकेतस्थळ)

१२) एम.के.सी.एल.कक्ष (आज्ञावली)